
ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार १९ जून, १९६८ | अंक १२






ओगले
मोटर्स
सर्वांत
अधिक
शक्तीसाठीं

उत्पादक :
ओगले ग्लास वर्क्स लि.
ओगलेवाडी, जि. सातारा


# मातेची माया !



व्रतबंधाचे मंगल कार्यात मातृभोजनाचे प्रसंगी आईच्या हातचे दोन घास घेऊन बाळ विद्येच्या तप:साधनेस प्रवृत्त होतो. मातेची ही पांखर त्याच्या पुढील जीवनांत उत्साह देते. पण तेवढ्यानेच भागत नाहीं. त्याचे विद्यार्थी जीवन आर्थिकदृष्ट्या समाधानकारक जाण्यासाठीं आईवडिलांनीं वेळींच बचत करून ठेवलेला पैसा प्रत्यक्षांत फार महत्त्वाचा ठरतो.

महाराष्ट्र बँक सोयीची बचत योजना मुळून मातेच्या मायेस उपयुक्ततेची झालर लावेल.

तेरा वर्षांवरील विद्यार्थ्यांना स्वत:ही खातें उघडून शिल्लक टाकतां येते.



दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १९ जून, १९६८





संस्थापक
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।* — कौटिलीय अर्थशास्त्र

## जुन्या समाजरचनेला विद्यार्थ्यांचे आव्हान

अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठातील प्राध्यापक केनेथ गालब्रथ ह्यांनी टोकिओ येथे केलेल्या भाषणांत जगांतील विद्यार्थ्यांत उसळलेल्या अस्वस्थतेबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की, सध्या कम्युनिस्ट शासित देशांतील आणि इतर बाहेरच्या देशांतील विद्यार्थ्यांत अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. ही विद्यार्थ्यांमधील बेदिली आणि अशांतता तात्कालिक स्वरूपाची नसून ती बराच दीर्घ काळ टिकणारी आहे. कारण ती जगांतील उद्योगीकरणाच्या वाढीतून निर्माण झालेली आहे. जगातील जुनी समाजव्यवस्था मोडकळीस आल्याची लक्षणे दिसत आहेत. काही नव्या प्रकारची समाजरचना ह्यातून उगम पावण्याची शक्यता आहे. आधुनिक उद्योगप्रधान समाजरचनेची सूत्रे ज्यांच्या हाती असतात त्यांच्याच हाती सत्ता असते असा नियम दिसून येतो. पण, विद्यार्थ्यांना हा नियम मंजूर नाही. उद्योगप्रधान समाजाची दोन ध्येये असतात. पहिले ध्येय आर्थिक विकास व वाढ आणि दुसरे उत्पादन तंत्राची सतत होणारी परिणती. परंतु विद्यापीठांतून शिकणाऱ्या आजच्या तरुणांना ही दोन्ही ध्येये मान्य नाहीत. उद्योगप्रधान समाजरचनेने मान्य केलेली वरील ध्येये गाठण्यासाठी असंख्य प्रशिक्षित लोकांची गरज असते; तरच ती ध्येये गाठता येणे शक्य असते. वस्तुस्थिती अशी आहे की नेमका हाच प्रशिक्षितांचा वर्ग प्रचलित समाजव्यवस्थेवर आघात करीत आहे. टोकिओपासून पॅरिसपर्यंत आणि न्यूयॉर्कपासून प्रागपर्यंत विद्यार्थ्यांच्या चळवळीच्या लाटा उसळत आहेत. तथापि, ह्या चळवळीचे मूलगामी स्वरूप आणि उद्दिष्टे ही दोन्ही अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. आधुनिक उत्पादनतंत्र आणि जुनी सामाजिक ध्येये ह्यांना विद्यार्थ्यांनी आव्हान दिलेले आहे.

---

## औद्योगिक उत्पादनात पुन्हा वाढ होऊ लागली

गेल्या एकदोन वर्षांत उद्योगधंद्यांत मंदीची लाट उसळल्याने उत्पादनाला उतरती कळा लागली होती. मंदीमुळे औद्योगिक उत्पादन सालीना ८ टक्क्यांवरून २·४ टक्क्यांइतके खाली घसरले होते. तथापि गेल्या काही महिन्यांत उत्पादनात सुधारणा होऊन ते आता ४ ते ४·५ टक्क्यांपर्यंत उंचावले आहे. १९६८–६९ सालात उत्पादनातील वाढ ६ टक्क्यांपर्यंत जाईल असा अंदाज करण्यात येत आहे. हिंदच्या औद्योगिक विकासखात्याचे मंत्री श्री. फक्रुद्दिन अली अहमद ह्या विषयासंबंधी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, औद्योगिक मंदीमुळे सुस्तावलेल्या उद्योगधंद्यांना नव्याने प्रेरणा देण्यासाठी सरकारने काही उपाय योजले होते. त्यांचा उपयोग होऊन पूर्व भारतामधील उद्योगधंदे पुन्हा जोमाने चालू झाले आहेत अगर होत आहेत. भारी एंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्यांची वाढ होत आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत हिंदच्या पोलाद–उत्पादनाच्या क्षमतेत निदान २० ते ३० लाख टनांची भर पडेल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे रांची येथील अवजड यंत्रसामग्रीच्या कारखान्याला पुरेसे काम मिळेल. ह्या कारखान्यात व दुर्गापूर येथील कारखान्यात तयार होणाऱ्या मालात अधिक विविधता आणण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. रशियन तज्ज्ञांनी विविधता आणण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपायांचा अहवाल सादर केला आहे. त्यांच्या मताप्रमाणे येत्या चार–पाच वर्षांत भारतामधील पोलादाची मागणी बरीच वाढणार आहे. अर्थातच नवीन पोलादाचे कारखाने काढावे लागतील किंवा सध्याच्या पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करून त्यांची उत्पादनक्षमता वाढवावी लागेल.

---

## मोटार कारखान्यांचे उत्पादन सावरू लागले

भारत सरकारच्या औद्योगिक विकासखात्याने २७ प्रमुख उद्योगधंद्यांतील सद्यःपरिस्थितीचा अलीकडेच अभ्यास केला आहे. त्यावरून असे दिसून येते की, गेल्या काही महिन्यांत उद्योगधंद्यावर पडलेली मंदीची छाया ओसरू लागली आहे; निदान तिची घनता कमी होत चालली आहे. सर्व धंद्यांत मोटार कारखान्यांनी आपले उत्पादन चांगले सावरले आहे. गेल्या चार महिन्यांत व्यापारी मोटारींचे उत्पादन त्यामागील दोन चौमाहीच्या मानाने २४ टक्क्यांनी वाढले आहे. प्रवासी मोटारगाड्यांचे उत्पादन ७·५ टक्क्यांनी वाढले आहे. स्कूटर्स आणि ऑटोरिक्षा ह्यांचे उत्पादन ११ टक्क्यांनी वाढले आहे. ट्रॅक्टर्सचे उत्पादन ४·२ टक्क्यांनी वाढले आहे. जीपगाड्या आणि मोटारसायकली ह्यांचे उत्पादन मात्र अद्याप वाढू लागले नाही.

## छोट्या उद्योगधंद्यांचे स्थान आणि कार्य

उद्योगीकरण हा शब्द उच्चारताच प्रचंड प्रमाणावरील उद्योगधंद्यांची चित्रें डोळ्यासमोर येतात. मोठ्या उद्योगधंद्यांचे भारतामधील स्थान व कार्य महत्त्वाचे आहेच. परंतु असे उद्योगधंदे उभारणे सर्वच ठिकाणी शक्य होत नाही, आणि म्हणून छोट्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. देशात उत्पादन होणाऱ्या मालात छोटे उद्योगधंदे भर घालीत असतात. ह्या उद्योगधंद्यांत दरसाल उत्पन्न होणाऱ्या मालाची ठोक किंमत जवळ जवळ २,८०० कोटी रुपये असते अशी माहिती अधिकृतरीत्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. छोट्या उद्योगधंद्यांत गुंतलेले भांडवल सुमारे ४३० कोटी रुपयांचे असून त्यात ३० लाख लोकांना रोजगारी मिळालेली आहे. ह्या विभागात उत्पादन करण्यासाठी म्हणून ४५ प्रकारचा माल राखून ठेवण्यात आला आहे. सरकार छोट्या उद्योगधंद्यांना गिऱ्हाईक ह्या नात्याने उत्तेजन देत असते. गेल्या आर्थिक वर्षात सरकारने २२ कोटी रुपयांचा माल छोट्या उद्योगधंद्यांकडून विकत घेतला. त्याशिवाय ह्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ही संघटना प्रयत्न करीत असते. ही संस्था ह्या उद्योगधंद्यांना हप्त्याने यंत्रसामग्री पुरवीत असते. गेल्या आर्थिक वर्षात ४ कोटी रुपयांची यंत्रसामग्री संघटनेने पुरविली. ह्याशिवाय उद्योगधंद्यांना लागणारा, किमतीवर नियंत्रणे असलेला अनेक प्रकारचा कच्चा मालही संघटना पुरवीत असते. त्यामुळे अनेक राज्यांतून छोट्या उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी मागण्या येत आहेत. ज्या राज्यातून शिक्षणप्रसार चांगला झालेला आहे आणि ज्यातून तांत्रिक शिक्षण घेतलेले लोक अधिक आहेत त्या राज्यातून मागणीचा विशेष जोर आहे.


---

## सांस्कृतिक क्रांतीचा तेलाच्या धंद्यावर परिणाम

चीनमधील सांस्कृतिक क्रांतीच्या चळवळीमुळे तेथील खनिज तेलाच्या धंद्यावर विपरीत परिणाम झाला आहे. ह्या चळवळीचे लोण गेल्या वर्षी तेल उपसण्याच्या कारखान्यात आणि तेलशुद्धीच्या कारखान्यात पोचले. त्यामुळे तेलाचे उत्पादन घटले. अजूनही ते पूर्वीच्या पातळीवर आलेले नाही. तथापि तेलाचे नवीन साठे शोधून काढण्याचे प्रयत्न मात्र अजूनही चालू आहेत. १९६३ साली चीनने रशियाकडून तेलाच्या विहिरी खणण्याची लक्षावधी डॉलर्स किमतीची यंत्रसामग्री विकत घेतली. चीनने १९६० सालापासून रशियाकडून अशुद्ध तेल विकत घेण्याचे बंद केले. तेव्हापासून चीन रुमेनिआचे गिऱ्हाइक झाला आहे. चीनमध्ये खनिज तेलाचे २४ मोठे साठे आणि नैसर्गिक वायूचे ११ साठे आहेत, अशी माहिती मिळते.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे. संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठीं
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे...
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.




किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस-एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

## श्री. ना. य. उर्फ भाऊसाहेब नेने

### कुलाबा जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय व आर्थिक कामगिरीचा परिचय

कुलाबा जिल्ह्यातील प्रमुख व्यक्तींमध्ये श्री. ना. य. तथा भाऊसाहेब नेने यांचा समावेश होतो. त्यांचा जन्म अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे १९०६ मध्ये झाला व बालपण रेवदंडा येथेच गेले. त्यांचे शिक्षण पेण येथे झाले. पेण येथे स्थायिक होऊन १९२८ पासून मिठाचा व पोह्यांचा व्यापार करण्याचा व्यवसाय ते आजतागायत करीत आहेत.


सामाजिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी डोळयात भरण्यासारखी आहे. १९३६ पासून पेण मॅटर्निटी होमच्या कार्यकारी मंडळावर ते असून हल्ली ते त्याचे अध्यक्ष आहेत. १९४८ पासून ते "गांधीमंदिर" ह्या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर आहेत. त्यांनी १९३८ ते १९५६ पर्यंत पेण प्रायव्हेट हायस्कूलच्या कार्यकारी मंडळावर सेक्रेटरी व अध्यक्ष म्हणून काम केले. १९४८ ते १९५० पर्यंत ते कुलाबा जिल्हा होमगार्डचे होमगार्ड कमांडर होते. १९२८ पासून १८ वर्षे पेण नगरपालिकेचे सभासद व काही काळ अध्यक्ष होते.



**श्री. भाऊसाहेब नेने**
स्थापनेपासून आजतागायत चेअरमन

१९२७ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. १९५२, १९५७, १९६२ व १९६७ मध्ये कुलाबा जिल्हा कॉंग्रेस निवडणूक मंडळ प्रमुख म्हणून त्यांनी काम केले. तसेच १९५० व १९६७ मध्ये जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला.

१९४५ पासून ते पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कार्यकारी मंडळावर असून विद्यमान चेअरमन आहेत. कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पेण ह्या संस्थेचे सुरवातीपासून आजतागायत ते चेअरमन आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेची सर्वांगीण प्रगती होत आहे.



कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ची नवी इमारत



**श्री. प. वि. म्हात्रे**
बी. ए., एच. डी. सी. मॅनेजर

### ऑस्ट्रेलियन स्त्री-स्पर्धकांचे मिनि-स्कर्ट

पुढील वर्षीच्या मेक्सिको ऑलिंपिक्सचे वेळी स्त्री-स्पर्धक मिनि-स्कर्ट वापरतील. हे मिनि-स्कर्ट ऑस्ट्रेलियाचे माजी पंतप्रधान मि. हॅरॉल्ड होल्ट ह्यांची पत्नी मिसेस झारा होल्ट ह्यांच्या डिझाइनचे आहेत. मिसेस होल्ट ह्या ऑस्ट्रेलियाच्या फॅशन जगतातील एक अग्रेसर महिला आहेत.

### कॅपिटल ग्रंथाचे मल्याळी भाषान्तर

कार्ल मार्क्सच्या सुप्रसिद्ध कॅपिटल ह्या ग्रंथाचे मल्याळी भाषांतर एका साहित्य प्रसारक सहकारी संघटनेने प्रकाशित केले आहे. ह्या ग्रंथाचे भारतीय भाषेतील हे पहिलेच समग्र भाषांतर आहे. कार्ल मार्क्सच्या १५० व्या जयंतीनिमित्त हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

—महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था—

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना—१९१८ : टेलिफोन नं. ५४९६०

नवीन वर्षासाठी गुरुवार दि. २० जून १९६८ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू होतील.

महत्त्वाचे अभ्यासक्रम

१. गव्हर्नमेंट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स ( जी. सी. डी. ) मुदत :—१ वर्ष, किमान पात्रता :—एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी. खास विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वर्ग

२. प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा किमान पात्रता :—इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.

३. प्री-डिग्री आर्ट्स एक्स्टर्नल परीक्षा किमान पात्रता—इंग्रजी घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यमः—मराठी व इंग्रजी.

इतर अभ्यासक्रम

बी. कॉम. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी व मराठी शार्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स, इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग व मॅनेजमेंट कोर्स, मार्केटिंग मॅनेजमेंट कोर्स, वगैरे.

प्रसिद्धिपत्रक : ३० पैसे

ए. जी. भोपटकर
एम्. कॉम., एलएल्. बी.

### अन्नधान्याच्या साठ्यासाठी गुदामे

हिंदमधील अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक दिशांनी प्रयत्न करण्यास येत आहेत. सुधारलेले बीबियाणे, खतांचा वापर, जमिनीची शास्त्रशुद्ध मशागत इत्यादी उपाय योजण्यात येत आहेत. पाणीपुरवठ्याच्या सोयीही अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ह्या सर्व उपायांचा परिणाम होऊन शेतीत क्रांतिकारी बदल घडून येत आहे असे सांगण्यात येत आहे. शेतीत होणारी क्रांती अधिक अन्नधान्य उपलब्ध करून देऊ शकली तरी पिकलेल्या धान्याचा साठा करण्याची सोय नसल्यास तिचा फारसा उपयोग होणार नाही. भारतामधील शेती अजूनही बेभरंवशाच्या पावसावरच बरीचशी अवलंबून आहे. त्यामुळे पिकाच्या दृष्टीने चांगल्या गेलेल्या हंगामातील धान्य योग्य रीतीने साठवून ठेवून नापिकी हंगामात त्याचा उपयोग करणे आवश्यकच ठरते. म्हणून शेतीचा माल साठविण्यासाठी भरपूर गुदामे असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला शेतीच्या मालाचा योग्य भाव मिळावा म्हणूनच केवळ गुदामांची जरुरी आहे असे नाही. परंतु गुदामे बांधण्यासाठी पैशाची मोठी जरुरी भासते. भारत सरकार आता गुदामे बांधण्यासाठी खाजगी मालकीचा पैसा आकर्षित करणे कितपत शक्य आहे ह्याचा विचार करणार आहे. त्याचप्रमाणे गुदामे बांधण्यावर असलेले निर्बंधही काढून टाकण्याचा विचार करीत आहे. येत्या दोन-तीन वर्षांत धान्य साठविण्याची पुरेशी सोय झाली नाही तर शेतीचे उत्पादन वाढवूनही देशाला त्याचा फायदा घेता येणार नाही ह्याची जाणीव अधिकारी वर्गाला झाली आहे. देशाची अर्थव्यवस्था व्यवस्थित चालू राहण्यासाठी धान्यसाठ्याच्या गुदामांना महत्त्वाचे स्थान आहे.

---

### भारी उद्योगधंद्यांत पाकिस्तानची अल्प प्रगती

पाकिस्तानात आर्थिक नियोजन करण्यास प्रारंभ झाल्यापासून १५ वर्षांचा काळ लोटला आहे. परंतु ह्या अवधीत भारी उद्योगधंद्यांच्या स्थापनेकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही. परिणामी लोखंड, पोलाद, विजेची भारी यंत्रसामग्री, इत्यादी मालाच्या उत्पादनाबाबत अल्प प्रगती झाली आहे. परंतु, आता पाकिस्तानचे सरकार नव्या दिशेने विचार करू लागले आहे. ग्राहकांना लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंचे कारखाने उभारण्याऐवजी आता मूलभूत स्वरूपाच्या उद्योगधंद्यांच्या उभारणीवर अधिक भर देण्यात येऊ लागला आहे. विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्यासाठी तक्षिला येथे एक कारखाना स्थापन करण्यात येणार आहे. त्यासंबंधी रशिआबरोबर एक करारही करण्यात आला आहे. कालाबाग येथे एक पोलादाचा कारखाना काढण्यात येणार आहे.


आमचेकडील • आमचेकडून
आपली • आपले
ठेव • उत्पन्न

| ( मुदत ) | | ( व्याज दर ) |
|---|---|---|
| दिवस | ९१ | ५.२५ |
| महिने | ६ | ५.७५ |
| वर्ष | १ | ६.२५ |
| वर्ष | २ | ६.५० |
| वर्ष | ३ | ६.७५ |
| वर्ष | ५ | ७.२५ |
| वर्ष | ७ | ७.५० |
| वर्ष | ९ | ७.६२ |

सेव्हिंग बँक खाते ४=०० व्याज

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

( स्थापना-१९३६ )

शाखा एकतीस

मुख्य कचेरी-सातारा



तारेचा पत्ता "मॉर्गेज" मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र २५६५२७

मुंबई राज्य सहकारी
भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक

## टाटा कंपनीच्या खत कारखान्याबद्दल विचार

गुजरात राज्यात एक मोठा खताचा कारखाना व तदनुषंगिक इतर काही रासायनिक कारखाने काढण्याची योजना टाटा कंपनीने नियोजन समितीला सादर केली आहे. मक्तेदारी स्थापन होण्याच्या भीतीने कारखान्याला समितीचा विरोध आहे अशी वार्ता होती. परंतु ह्या बाबतीत समितीने अद्याप कोणताच निर्णय घेतला नसून योजनेचा अभ्यास समिती करीत आहे. मूळ योजनेला काही पर्यायी योजना समितीकडून सुचविल्या जाण्याची शक्यता आहे. नियोजन समितीला एवढा मोठा कारखाना खाजगी मालकीच्या विभागात निघण्यास नको आहे. शिवाय कारखान्यासाठी लागणारा काही कच्चा माल सुरुवातीची काही वर्षे आयात करण्यात यावा अशी टाटा कंपनीची सूचना आहे. ह्या मालाऐवजी कोळशापासून तयार होणारा पर्यायी कच्चा माल वापरावा अशी नियोजन समितीची सूचना आहे. ही सूचना अमलात आणली तर खत कारखान्याच्या उभारणीचा खर्च वाढणार आहे. पण तयार होणारे खत देशातील बाजारपेठेतच खपवावयाचे असल्याने वाढत्या खर्चाची चिंता बाळगण्याचे कारण नाही असे समितीचे म्हणणे आहे. कोळशापासून तयार होणारा व खत कारखान्यासाठी जरूर असणारा पर्यायी कच्चा माल तयार करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री भारतातच तयार करता येण्यासारखी आहे. तथापि, असा कारखाना गुजरात राज्यात मात्र उभारता येणार नाही. त्यासाठी मध्य भारतामधील जागा निवडावी लागेल. कारण, मध्य भारतात जरूर तो कमी दर्जाचा कोळसा मुबलक प्रमाणात मिळण्यासारखा आहे. गुजरातमधील संकल्पित कारखाना मिठापूर येथे काढण्याचे घटत आहे.

---

## राजश्रीचे परदेशी प्रयाण; निर्माते अडचणीत

सुप्रसिद्ध सिनेनटी राजश्री मंगळवार दि. ११ रोजी अचानक अमेरिकेला निघून गेल्यामुळे पाच चित्रपटनिर्माते अडचणीत सापडले आहेत; ती आपल्या अमेरिकन पतीबरोबर अमेरिकेला गेली असून केव्हा परत येणार ह्याचा अंदाज तिने कुणालाच दिलेला नाही, असे प्रसिद्ध झाले आहे. ह्या पाच निर्मात्यांच्या पाच चित्रपटांतील गुंतवणूक २ कोटी रुपयांच्या घरात असून त्यात ४० लक्ष रु. ची परदेशी हुंडणावळही अंतर्भूत आहे. निर्मात्यांनी नभोवाणीखात्याचे मंत्री श्री. के. के. शहा ह्यांची भेट घेऊन राजश्रीला परत बोलाविण्याचे कामी त्यांचे मार्गदर्शन मागितले आहे. पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी ह्यांनाही मध्यस्थी करण्यास सांगण्याचे ठरले आहे. राजश्री काम करीत असलेल्या चित्रपटांची नावे सुहाग रात, मोहब्बत की नहीं जाती, दीदार, नयना आणि उम्मीद पे दुनिया जीती है, अशी आहेत.

---

## अमेरिकेत पिस्तुलांची आणि रायफलींची जीवघेणी 'खेळणी'

### सिगारेट्स प्रमाणे सुलभता

पिस्तुले आणि रायफली ह्यांना जॉन एफ. केनेडी, मार्टिन ल्यूथर किंग आणि रॉबर्ट एफ केनेडी हे बळी पडल्यापासून ही हत्यारे अमेरिकेत सिगारेट्स इतक्या सुलभतेने विकत मिळतात, ह्या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. अमेरिकन जनतेच्या हाती, खाजगी मालकीत, ५० लक्ष ते दोन कोटी अशी हत्यारे असावीत असा अंदाज आहे. १९६६ मध्ये अशा हत्यारांचा उपयोग करून अमेरिकेत ६,५०० खून झाले, १०,००० आत्महत्या झाल्या आणि २,६०० जणांना अपघाती मरण आले. अमेरिकेने आजवर जेवढ्या युद्धांतून भाग घेतला, त्यांत मृत्यू पावलेल्या एकूण अमेरिकनांपेक्षा जास्त बळी ह्या खाजगी हत्यारांनी चालू शतकात घेतलेले आहेत; त्यांची संख्या ७½ लाखावर भरेल. दोन वर्षापूर्वीच बॉबी केनेडीने म्हटले होते, " फार दीर्घ काळ ह्या प्राणघातक हत्यारांना निर्धोक खेळण्यांप्रमाणे आपण मानीत आलो आहो. ती हत्यारे कुठेही, केव्हाही, कुणालाही सहज विकत घेता येतात, बाळगता येतात. त्यामुळे एवढी हिंसात्मक कृत्ये घडतात. आपल्या देशावरील हा हिंसेचा कलंक आपण नष्ट केलाच पाहिजे. "

---

## २० जून–इंडस्ट्रिअल फौंडेशन डे

### उद्देशः तरुणांच्या विचारसरणीत क्रांतिकारक सुधारणा

महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचे जनक, कै. श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, ह्यांचा २० जून हा जन्मदिन. त्यांच्या परिश्रमामुळेच आपल्याला भारताच्या औद्योगिक नकाशावर स्थान प्राप्त झाले. तथापि, महाराष्ट्रीयांचा औद्योगिक विकास सर्वांगीण झालेला नाही; त्याची गतीही मंद आहे आणि मुंबई वगळली तर आपण औद्योगिक दृष्ट्या मागासलेलेच आहोत. हे चित्र पालटण्यासाठी तरुणांच्या विचारात क्रांती घडून आली पाहिजे; त्या चळवळीला शुभारंभ लक्ष्मणरावांच्या जन्मदिनी २० जून रोजी करून, हा दिवस इंडस्ट्रिअल फौंडेशन डे म्हणून साजरा करण्याचे कामी श्री. रमेश सी. शहा आणि श्री. यशवंत टी. धारप ह्यांनी पुढाकार घेतला आहे त्यानिमित्त पुणे येथे एक प्रातिनिधिक समारंभ आयोजला आहे.

---

## लाखाव्या पोस्ट ऑफिसानिमित्त खास तिकीट

भारतातील १,००,००० वे पोस्ट ऑफिस उघडण्यात येऊन त्यानिमित्त १ जुलै रोजी एक तिकीट काढण्यात येणार आहे.

## रोगांच्या निदानासाठी हस्तसामुद्रिकांची मदत

ज्योतिष, हस्तसामुद्रिक इत्यादी शास्त्रांना आधुनिक शास्त्रज्ञानात जागा नाही. आधुनिक शास्त्रज्ञानाच्या ज्या कसोट्या मान्य झालेल्या आहेत त्यांना वरील शास्त्रे उतरत नाहीत; आणि तरीही अमेरिकेसारख्या प्रगत देशात रोगनिदानासाठी हस्तसामुद्रिक विद्येची मदत घेण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. तसे म्हटले तर हाताच्या बोटांच्या अगर नखांच्या अवस्थेवरून रोगाचे निदान डॉक्टर्स करतात; नाही असे नाही. उदाहरणार्थ नखे फिकट आणि रुक्ष असली तर निकस आहाराचे निदान करण्यात येते. तथापि, हातावरील रेषांचा आणि आरोग्याचा काहीतरी संबंध असावा अशी शंका वैद्यकीय शास्त्रज्ञांना आता येऊ लागली आहे. रेषांच्या सूक्ष्म अभ्यासाने रोगनिदानास साह्य होईल असे त्यांना वाटू लागले आहे. हस्तसामुद्रिक ही एक प्राचीन विद्या आहे. ह्या विद्येची परंपरा निदान ६ हजार वर्षांची जुनी आहे. हस्तसामुद्रिकांच्या मताने हातावरील रेषांच्या सूक्ष्म अभ्यासाने रोगनिदान करता येते. आधुनिक शास्त्रांच्या विचारप्रणालीच्या कसोटीला ही विद्या कितपत उतरते हे पाहण्यासाठी अमेरिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यात काम करणाऱ्या डॉक्टरांनी १० हजार रोग्यांच्या तळहाताचे व बोटांचे ठसे घेण्याचे ठरविले आहे. ह्या ठशांचा अभ्यास करून रोगनिदान करणे कसे काय शक्य आहे ते पाहण्यात येणार आहे. ह्या योजनेच्या प्रमुखांच्या मताने काही विशिष्ट रोगाने पछाडलेल्या रोग्यांच्या तळहाताचे व बोटांचे ठसे अगदी मुलखावेगळे आढळून येतात. काही प्रकारच्या मानसिक विकृती, काही जन्मजात रोग, पक्षघात, हृदयविकार, इत्यादी रोगांची लक्षणे रोग्यांच्या हातावरील रेषांत उमटलेली दिसतात.

---

**यंत्रचलित नांगरांचा कारखाना**—भारत सरकार बल्गेरिआच्या मदतीने यंत्रचलित नांगरांचा एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. कारखाना सार्वजनिक मालकीचा असेल. ह्या कारखान्याचा तपशील अजून ठरावयाचा आहे. १९७०-७१ च्या सुमारास भारताला दरसाल ४० हजार ट्रॅक्टर्सची गरज लागणार आहे. कारखाना काढण्यासाठी हिंदी उद्योगपतींनी जो खर्चाचा अंदाज दिला होता तो सरकारला पटला नाही.

**१४ हजार शिक्षकांना कमी करणार**—आंध्र सरकारने राज्यातील १ लाख, ५० हजार शिक्षकांपैकी १४ हजार शिक्षकांना कामावरून काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. त्यात प्राथमिक व माध्यमिक अशा दोन्ही शिक्षकांचा समावेश आहे. सरकारने चालविलेल्या, जिल्हा परिषदेने चालविलेल्या, त्याचप्रमाणे पंचायतीच्या व नगरपालिकांच्या शाळांनाही हा आदेश लागू आहे. कायम झालेल्या शिक्षकांना मात्र कमी करण्यात येणार नाही.

## अणुशक्तीच्या संशोधनासाठी प्रयोगशाळा

इंडिअन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट ह्या संघटनेत शेतीसाठी अणुशक्तीचा उपयोग करण्याविषयी संशोधन करण्यात येणार आहे. हे काम करण्यासाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळाच स्थापन करण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मदतीने सुरू करण्यात यावयाची ही प्रयोगशाळा येत्या जुलै महिन्यापासून सुरू होईल. वनस्पतीचे पोषण, त्यांच्या मुळांचा विकास, जमिनीचा सुपीकपणा, भूमिगत पाण्याचे साठे, इत्यादी बाबतीत अणुशक्तीचा काय उपयोग करता येईल ह्यासंबंधी खास संशोधन करण्यात येणार आहे. सध्या संस्थेत शेतकी अधिकाऱ्यांना अणुशक्तीच्या उपयोगाविषयी प्रशिक्षण देण्यात येत आहे. अभ्यासक्रम पार पाडण्यासाठी आठ राज्यांतील शेतकी अधिकारी आले आहेत.

---

## जमिनीच्या वाटपात भ्रष्टाचाराचा प्रकार

गेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर उत्तरप्रदेशात संयुक्त विधायक दल ह्या संघटनेचे सरकार स्थानापन्न झाले. त्यापूर्वीच्या म्हणजे काँग्रेसच्या सरकारने मोठ्या जमीनदारांच्या जमिनीचे वाटप करताना भ्रष्टाचार केला अशा अनेक तक्रारी नव्या सरकारकडे आल्यावर, गेल्या ऑक्टोबरमध्ये ह्या प्रकाराची चौकशी करण्यात आली. चौकशी आता पूर्ण झाली असून जमिनीच्या वाटपात १ लाख, २५ हजार एकर जमीन अयोग्य रीतीने वाटण्यात आल्याचे दिसून आले. राज्याच्या ४४ जिल्ह्यांतील १ लाख २५ हजार एकर जमिनीचे वाटप बेकायदेशीर रीतीने झाल्याचे आढळून आले. काँग्रेसच्या राजवटीत ३ वर्षे हा गैरवाटपाचा प्रकार चालला होता. भूमिहीन मजुरांना शेतजमीन देण्याऐवजी ज्यांच्याजवळ आधीच खूप जमीन होती अशा लोकांनाच अधिक जमीन देण्यात आली आहे.

---

## पिकांच्या विम्याची योजना अडचणीत

मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेती खात्याने पिकांचा सक्तीचा विमा उतरण्याची एक योजना राज्य सरकारांनी अमलात आणण्यासाठी तयार केली होती. परंतु योजनेसाठी येणारा खर्च व कारभारातील अडचणी ह्यामुळे बहुतेक राज्य सरकारांनी योजना कार्यवाहीत आणण्यास नकार दिला आहे. त्यामुळे ती आता अर्थखात्याकडे परत पाठविण्यात आली आहे. बहुतेक राज्यांनी योजनेच्या खर्चाचा मोठा भाग मध्यवर्ती सरकारने द्यावा अशी सूचना केली आहे. योजना प्रथम प्रयोग म्हणून अमलात आणावी; त्यासाठी लागणारा प्राथमिक खर्च देण्याची तयारी मध्यवर्ती सरकारने दाखविली होती. आतापर्यंत आठ राज्यांची नकारार्थी उत्तरे आली आहेत,

## चौथ्या योजनेच्या काळात बेकारीत वाढ होणार

औद्योगिक समाजरचनेत बेकारी ही एक कायमची डोकेदुखी होऊन बसलेली आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतीत आघाडीवर असणाऱ्या देशांनासुद्धा बेकारीवर उपाय सापडलेला नाही. रशिआसारख्या समाजवादी देशातील उद्योगधंद्यांचा विकास अद्याप पाश्चात्त्य देशांच्या मानाने अपुरा आहे. तेव्हा तेथे बेकारी नसली तरी त्यावरून काही निष्कर्ष काढता येत नाहीत. भारतासारख्या मागासलेल्या देशात बेकारी असणे ह्यात आश्चर्य नाही. तीन पंचवार्षिक योजना होऊन गेल्या असल्या तरी ह्या रोगावर अद्याप उपाय सापडलेला नाही. उलट, चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात बेकारांची संख्या खूपच वाढणार आहे अशी चिन्हे दिसत आहेत. ह्या काळात रोजगार शोधणाऱ्या माणसांच्या संख्येत २·७३ कोटी लोकांची भर पडणार आहे. त्यापैकी फक्त निम्म्या लोकांनाच रोजगार देता येईल. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभकाली अगोदरच ९५ लाख लोक बेकार होते. योजनेच्या पहिल्या रूपरेषेप्रमाणे २३,५७० कोटी रुपयांची भांडवलगुंतवणूक करण्यात येणार होती. त्यामुळे १·८ कोटी नव्या रोजगारांची भर पडेल असा अंदाज करण्यात आला होता. परंतु इतकी भांडवलगुंतवणूक करणे शक्य नसल्याचे आढळून आले आहे. परिणामी उपलब्ध होऊ शकणाऱ्या रोजगारांची संख्या अंदाजाइतकी झाली तरी मिळवली, असे म्हणावे लागणार आहे. गेल्या तीन पंचवार्षिक योजनांचा अनुभव विचारात घेता भांडवलगुंतवणूक आणि रोजगारांची उपलब्धता ह्यांच्यातील प्रमाण घसरणीला लागल्याचे आढळून आले आहे. चौथी पंचवार्षिक योजना ह्या अनुभवाला अपवाद ठरेल असे वाटत नाही.


---

## जवानांच्या कणखरपणाचे कौतुक

सिक्किमच्या आघाडीवरील हिंदी लष्कराच्या ठाण्याची पाहणी करण्यासाठी ७ देशांतील लष्करी अधिकारी भारतात आले होते. रशिआ, इंडोनेशिआ, कॅनडा, ऑस्ट्रेलिआ, फ्रान्स, इटली आणि ब्रिटन ह्या देशांतील अधिकाऱ्यांचा त्यात समावेश होता. लष्करी अधिकाऱ्यांच्या ह्या गटाने उंच उंच पर्वतांत आणि प्रतिकूल हवामानात काम करीत असलेल्या जवानांच्या कणखरपणाचे कौतुक केले आहे. जवानांचे मनोधैर्य आणि सतत रसद पुरविण्याचे कार्य ह्याचीही त्यांनी वाखाणणी केली. सिक्कीमच्या भागात काही ठिकाणी १४ हजार फूट उंचीवर अवघड ठिकाणी रस्ते बांधण्यात आले आहेत. हे काम तर अतिशय बिकट होतेच; पण तयार झालेले रस्ते नीट दुरुस्त करण्याचे कामही जिकिरीचे आहे.

---


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.



४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित)

: मुख्य कचेरी : — ९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... | रु. ५०,९५,६६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. १,०६,६५,९६,००० |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रुझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## पंजाब, उत्तर प्रदेशात गव्हाचे अमाप पीक

पंजाब आणि उत्तर प्रदेश ह्या दोन राज्यांत रबी गव्हाचे अमाप पीक आले आहे. त्यामुळे अन्नमहामंडळ आणि भारत सरकार ह्यांच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. पंजाब राज्यात चालू हंगामात ३२ लाख टन गहू निर्माण करण्यात आला आहे. गेल्या वर्षी २४ लाख टन गहू पिकविण्यात आला होता. पीक मुबलक आल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर गहू बाजारात आणू लागला. त्याचा फायदा घेऊन व्यापाऱ्यांनी तो विकत घेण्याचे नाकारले अगर अतिशय कमी भाव देऊ केला. त्यामुळे बाजारात गव्हाच्या किमती एकदम घसरतात की काय अशी भीती उत्पन्न झाली. शेतकऱ्यांची अशी लूटमार होऊ नये म्हणून अन्नमहामंडळाने बाजारात तातडीने गहू खरेदी करण्याचा निर्णय घेतला. हपूर येथील बाजारात उत्तर प्रदेश सरकार आणि अन्नमहामंडळ ह्यांनी गहू खरेदी करण्याची जोरार्ची मोहीम सुरू केली व १॥ लाख रुपयांचा मेक्सिकन जातीचा गहू खरेदी केला. बाजारातील घबराटीची परिस्थिती पाहून अन्नमहामंडळाच्या मीरत येथील अधिकाऱ्यांनी अन्नमहामंडळाला निर्वाणीची हाक दिली. तिला ओ देऊन अन्नमहामंडळाने गहू खरेदी करण्यासाठी ६ लाख रुपये त्वरेने पाठविले; आणि मग मंडळाने बाजारात जोरदार खरेदी करण्यास प्रारंभ केला. १९६५-६६ साली मंडळाने १५९ कोटी रुपये किमतीची अन्नधान्यखरेदी केली होती. १९६७-६८ साली मंडळाने ४५० कोटी रुपये किमतीची खरेदी केली. १९६५ ते १९६८ ह्या काळात अन्नमहामंडळाचा नफा २२ लाखांवरून ३०४ लाखांपर्यंत वाढला.

---


**आध्यात्मिक जीवनावर अनुबोधपट** – भारतामधील आध्यात्मिक जीवनासंबंधी एक अनुबोधपट काढण्याचे काम एक अमेरिकन चित्रनिर्माता करीत आहे. त्यासाठी ५ जणांची एक तुकडी मुंबईला आली होती मुंबईपासून ३५ मैलांवर असलेल्या गणेशपुरी आश्रमात ही तुकडी एक आठवडाभर मुक्काम करून होती. ह्याशिवाय दिल्ली, हृषिकेश, इत्यादी ठिकाणीही चित्रपटातील दृश्ये घेण्यात येत आहेत.

**तामीळ चित्रपटांवर निर्बंध** – सिहली भाषेतील चित्रपट-निर्मात्यांच्या प्रतिनिधिमंडळाने सिलोनचे पंतप्रधान श्री. सेनानायके ह्यांच्याकडे तामीळ व हिंदी भाषेतील चित्रपटांच्या आयातीबद्दल तक्रार केली आहे. परदेशी चित्रपटांच्या आयातीमुळे सीलोनमधील चित्रपटनिर्मितीच्या धंद्याला जबर धोका निर्माण झाला आहे असे मंडळाचे म्हणणे आहे. पंतप्रधानांनी दोन्ही भाषांतील चित्रपटांच्या आयातीवर निर्बंध घालण्याचे आश्वासन दिले आहे.

चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या

भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक
फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.